

कोल्हापूर : शोधनिबंध पुस्तिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. पी. एस. पाटील आदी.

# व्यवसायदूतांमुळे स्थानिक रोजगाराला बळ : डॉ. शिर्के

**कोल्हापूर, ता. २६ :** "व्यवसायदूतांच्या (बिझनेस करस्पॉंडंट) नियुक्तीमुळे बँकांच्या व्यवसायाभिमुखतेबरोबर स्थानिक रोजगाराभिमुखतेला बळ लाभले आहे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता तसेच दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या रा. ना. गोडबोले अध्यासनाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन यांनी लिहिलेल्या 'बिझनेस कॉरस्पॉंडंट मॉडेल अँड इट्स रोल इन बँकिंग सेक्टर' या प्रासंगिक शोधनिबंधाच्या पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. प्रा. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

# ‘बी.ए., बी.कॉम.’ परीक्षांचे वेळापत्रक आज होणार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तांत्रिक अडचणीमुळे शिवाजी विद्यापीठाने पुढे ढकललेल्या हिवाळी सत्रातील बी.कॉम., बी.एस्सी.सह पाच अभ्यासक्रमांच्या (नियमित अथवा सीबीसीएस) अंतिम (तृतीय) वर्षाच्या परीक्षा १२ एप्रिलपासून सुरू होणार आहेत. त्याचे सविस्तर वेळापत्रक आज, शनिवारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाणार आहे.

यातील बी.कॉम. बॅचलर ऑफ फूड टेक्नॉलॉजी अँण्ड मॅनेजमेंट व बी.एस्सी. फूड टेक्नॉलॉजी अँण्ड मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या परीक्षा १२ एप्रिल-पासून, बी.एस्सी.च्या १७ एप्रिलपासून, तर बी.ए.च्या परीक्षा ४ मेपासून होणार आहेत. त्याचे वेळापत्रक शनिवारी जाहीर होईल. ऑनलाइन परीक्षा देणाऱ्यांसाठी विद्यापीठाकडून मॉकटेस्ट घेण्यात येत आहे. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्यांपैकी वीस हजार विद्यार्थ्यांनी मॉकटेस्ट दिलेली नाही. त्यांनी ती लवकर द्यावी. याबाबत त्यांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास विद्यापीठाच्या हेल्पलाइनशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

दरम्यान, हिवाळी सत्रातील पाचव्या दिवशी बी.कॉम., आयटी, बँक मॅनेजमेंट, आदी विषयांच्या ३ हजार ४२५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. त्यामध्ये ३ हजार ४१३ जण ऑनलाइन परीक्षार्थी होते.